**पावसाळयात उद्‌भवणाऱ्या जलजन्य**
**साथरोगांच्या उद्रेकाबाबत**
**करावयाची उपाययोजना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्र. डब्ल्यूक्यूएम-२००५/प्र.क्र.-४२/पापु-१२,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक १० मे, २००५**

**परिपत्रक**

राज्यात सध्या अनेक ठिकाणी पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून प्रतिवर्षी राज्यात उन्हाळा सुरू झाल्यावर भूगर्भातील व भूपृष्ठावरील पाणी साठा कमी झाल्याने, तसेच पावसाळयात दूषित पाणी वाहून आल्याने, साथ रोगांचा प्रादूर्भाव ग्रामीण व नागरी भागात मोठ्या प्रमाणात होत असतो. अशा परिस्थितीत शासकीय पाणी पुरवठा योजनांच्या माध्यमातून वितरित होणाऱ्या पिण्याच्या पाण्यावर योग्य शुध्दीकरण प्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक असते. पाण्याचे शास्त्रोक्त पध्दतीने नियमीत शुध्दीकरण व निर्जंतुकीकरण न करता पाण्याचे वितरण झाल्यास साथरोगांचा प्रादुर्भाव होऊन प्रसंगी जिवितहानीचीही शक्यता असते. पिण्यासाठी स्वच्छ व शुध्द पाणी मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क असून त्याचा नियमित पुरवठा करणे ही अंतिमतः शासनाची जबाबदारी ठरते. यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासोबतच सार्वजनिक आरोग्य विभाग, नगर विकास विभाग, राज्य आरोग्य प्रयोगशाळा यांच्याकडून प्रत्येक वर्षी पावसाळयाच्या प्रारंभी सतर्कता बाळगण्याच्या सूचना सर्व क्षेत्रिय यंत्रणांना देण्यात येत असतात.

योग्य शास्त्रिय पध्दतीने नियमित शुध्दीकरण प्रक्रिया करून पाणी पुरवठा करणे, जलस्त्रोताजवळचा व जलवाहिन्यांजवळचा परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी पुरवठा यंत्रणांची वेळेवर व सुयोग्य देखभाल ठेवणे, सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होता किंवा नाही याची पहाणी करणे, डास / माशांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून स्वच्छता विषयक उपाययोजना करणे, पाणी शुध्दीकरणासाठी सर्व स्तरावर योग्य दर्जाची ब्लिचिंग पावडर, सोडियम हायपोक्लोराईट द्रावण, तूरटी यांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे. ज्या ठिकाणी ब्लिचिंग पावडरचा साठा नाही अथवा कमी आहे, तेथे ब्लिचिंग पावडरचा तात्काळ पुरवठा करणे. या बाबींची पुरेशी काळजी घेतल्यास जलजन्य साथ रोगांच्या उद्रेकास निश्चितच आळा बसु शकतो. आरोग्य विभागामार्फत क्लोरिन द्रावणाचा अथवा क्लोरीनच्या गोळयांचा साठा प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच उपकेंद्रात उपलब्ध करून दिला जातो. ज्या ठिकाणी साथीच्या रोगांचा उद्रेक झाला असेल किंवा होण्याची शक्यता असेल त्या ठिकाणी घरोघरी या द्रावणाच्या बाटल्यांचा अथवा क्लोरिनच्या गोळयांचा उपयोग करून पाणी शुध्द करून घेणे अत्यंत महत्वाचे व गरजेचे आहे. तरी, या दृष्टीने आवश्यक सूचना सर्व संबंधितांना द्याव्यात. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी असलेल्या प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रात कोणत्याही साथींचा उद्रेक होऊ नये याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी.

सुरक्षित पाणी मिळविण्यात येणाऱ्या अडचणींबरोबर दूषित पाणी पुरवठा, दूषित जलस्त्रोत, जुनाट आणि गंजलेले नळ (पाईप लाईन) व गटारामधून जाणाऱ्या जलवाहिन्या यामुळेही अनेकदा गॅस्ट्रो, काविळ, कॉलरा, अतिसार, विषमज्वर इत्यादी जलजन्य आजारांचा उद्रेक होत असतो. यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन्सची तपासणी करून, त्यांना गळत्या असल्यास त्या काढणे व त्या पाईप लाईन्स गटारातून अथवा गलिच्छ पाण्यातून जाणार नाहीत याची दक्षता घेणे. या सर्व बाबी बाबत अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. दुषित पाणी पुरवठ्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत पुरेशी जनजागृती केल्यास या उपायांची

अंमलबजावणी करण्याऱ्या शासकीय यंत्रणेच्या प्रयत्नांना जनतेकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळू शकतो. त्यामुळे माहिती प्रसारमाध्यमांद्वारे उदा. स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्ही., नेटवर्क, भीत्तीचित्रे, पोस्टर्स, बॅनर्स, लाउडस्पिकर्स ई. माध्यमांद्वारे दुषित पाण्यामुळे होणाऱ्या साथरोगांची माहिती जनतेला देण्यात यावी. यासाठी स्थानिक आठवडी बाजार, बस स्थानके, रेल्वेस्थानके, बाजारपेठा, धार्मिक व पर्यटन स्थळे, शाळा, कॉलेजेस अशा ठिकाणी जनजागृतीचे कार्यक्रम नियमितपणे राबविणे आवश्यक आहे. तसेच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या साप्ताहीक बैठका घेऊन कामाचा आढावा घेणे व त्यानुसार मार्गदर्शन करणे या बाबींवर सुध्दा लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

नागरिकांस निर्जंतूक व सुरक्षित पाणी पुरवठा करण्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मुलभूत कर्तव्यामध्ये कसूर करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणे हे सुध्दा आवश्यक आहे. साथरोग उद्रेकांना आळा घालण्यासाठी वरीलप्रमाणे उपाययोजनांची कठोर अंमलबजावणी करून जनतेस शुध्द व निर्जंतूक पाणी पुरवठा या सारख्या महत्वपूर्ण आणि जीवनावश्यक सामाजिक सेवा वेळेवर उपलब्ध करून देण्याबाबत सतर्क आणि जागरूक राहण्याच्या सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात याव्या व या उपाययोजनांचा नियमित आढावा घेण्यात यावा.

**(वि. शं. धुमाळ )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट मुंबई.
६) उपसचिव व संचालक (आर.एस.पी.एम.यू.)पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
७) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा पुणे.
८) विभागीय आयुक्त (सर्व)
९) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई
१०) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१३) जिल्हाधिकारी (सर्व)
१४) अधीक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५) महासंचालक (आरोग्य सेवा), आरोग्य संचालनालय, मुंबई.
१६) उपसंचालक (आरोग्य सेवा), राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे.
१७) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१८) मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व)
१९) सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) सर्व कार्यासने, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) निवड नस्ती, का.क्र. पा.पु. १२.